करोना 2020/सूचना/आदेश क्र. 163

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग

दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-1/ब-5/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दि. 31 /03/2020

प्रति,

1) आयुक्त, पनवेल महानगरपालिका
2) श्री. जयराम देशपांडे, उपजिल्हाधिकारी मेट्रो सेंटर क्र. 1 पनवेल.
3) उपविभागीय अधिकारी सर्व
4) तहसिलदार सर्व
5) गटविकास अधिकारी सर्व
6) मुख्याधिकारी नगरपरिषद / नगरपंचायत सर्व

विषय:- **करोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना**

संदर्भ:-1) उपआयुक्त, महसूल कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र. मशा/कार्या/साशा/करोना 2020 दि. 31/03/2020.
2) मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील करोना 2020/सूचनां/आदेश क्र.130 साशा/कार्या-1/ब-5/आ.व्य./करोनाविषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दि. 26/03/2020

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे की, मा. मुख्य सचिव, उत्तरप्रदेश शासन यांनी त्यांच्या राज्यातील मुळ निवासी असलेल्या व रोजगारानिमित्त महाराष्ट्र राज्यात सध्या स्थायिक असलेल्या नागरीकांना महाराष्ट्र राज्यातील लॉकडाऊन मुळे आहार सुविधा प्राप्त होत नसलेबाबत उल्लेख केला असून यात महाराष्ट्र शासनाने लक्ष देणेबाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र राज्यात लॉकडाऊन सुरु झाल्यापासून स्थलांतरीत मजूर/कामगार यांचे स्थलांतर तात्काळ थांबवून त्यांना निवारा गृह, भोजन इत्यादी आवश्यक सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देणेबाबत व तक्रारी येऊ न देणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सबब त्यामुळे 1) प्रत्येक रिलीफ कॅम्पला प्रत्येक जबाबदार अधिकारी यांची नेमणूक करावी. 2) त्यांना आवश्यक ते भोजन, पाणी, निवारा मिळेल असे नियोजन करावे व वेळोवेळी आवश्यकतेनुसार वैद्यकीय चाचणी करावी, Social Distancing समजून सांगावे. 3) आवश्यक ते पोलीस अधिकारी यांची गस्त ठेवावी. 4) पाच पेक्षा अधिक लोक जमू नये व अनावश्यक घटना घडू नये यासाठी सर्वतोपरी काळजी घ्यावी.

सबब आपण निवारागृहातील व्यक्तींची गैरसोय होणार नाही याबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी. याबाबत तक्रारी ही प्राप्त होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर काळात मानवीय दृष्टीकोन ठेवून निराधार व्यक्ती, गरजू मनोविकृत अवस्थेत असलेले, भिकारी, दिव्यांग, बेवारस, परप्रांतातील मजूर, कामगार व प्राणीमात्रांवर भूतदया दाखवून लॉकडाऊनच्या काळात सर्वांना अन्न प्राप्त होत राहील असे नियोजन करावे.

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दण्डाधिकारी रायगड-अलिबाग RAIGAD-ALIBAG

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी
रायगड - अलिबाग

प्रत :- मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन नवी मुंबई यांसकडे माहितीसाठी.